# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## दैनंदिन प्रेस नोट दि.१७/१२/१७
## दि.१६/१२/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ७०८/१७,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | पो.हवा.टिळेकर, वाकड पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | अरविंद आनंद कलाटे,वय-३५,रा.कलाटे चाळ,वाकड,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/१२/१७ रोजी ११/३५ वा. कलाटे चाळ,वाकड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम अरविंद आनंद कलाटे याने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने व निष्काळजीपणाने मागे घेत असताना,नमुद ठिकाणी असणारी मुलगी खुशी सुरेश चौधरी,वय-१४,रा.कलाटे चाळ,वाकड,पुणे हिस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,तीचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. घोळवे ८८८८८५४६११ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २८२/१७,भादविक १४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६(२),आर्म ४(२५) |
| **फिर्यादी** | राहुल कांबळे,वय-१९,रा.मंगळवार पेठ,पुणे् |
| **आरोपी** | १.गणेश ऊर्फ सुरज अशोक वड्डे,वय-२२ २.रुपेश राजेंद्र गायकवाड,वय-२१ ३.रुषीकेश सुनिल बागुल,वय-२०,सर्व रा.मंगळवार पेठ,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१२/१७ रोजी २०/०० वा. २२०,मंगळवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम हे एकमेकांचे ओळखीचे असुन,त्यांचेमध्ये असलेल्या जुन्या भांडणाचे कारणावरुन त्यांनी फिर्यादी व त्यांचे आई-वडिलांना शिवीगाळ व हाताने मारहाण करुन हातामध्ये कोयता घेऊन आरडा-ओरडा करुन सदर भागात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. चौहान ९५५२५२२८५२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ७०५/१७,भादविक १४३,१४७,१४९,४४८,४२७ |
| **फिर्यादी** | सौ.अलका कापडे,वय-४५,रा. |
| **आरोपी** | आठ ते दहा इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/१२/१७ रोजी १३/०० ते १३/३० वा.चे दरम्यान पाटीलनगर चिखली,निगडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम यांचेमध्ये जागेवरुन वाद चालु आहे. फिर्यादी हे त्यांचे कुटुंबा सह लग्नासाठी बाहेरगांवी गेले असताना,यातील सदर इसमांनी बेकायदेशीर जमाव जमवुन फिर्यादी यांचे जागेमध्ये अनाधिकृतपणे प्रवेश करुन,जीसीबीने फिर्यादी यांचे मुलाचे लग्ना साठीचा मंडप, कमान, पिठाणी गिरणी, किरणा मालाचे दुकान, एमएसईबी कनेक्शन, व फ्रिज पाडुन नुकसान केले आहे. (फिर्यादी यांनी मुलाचे लग्न व लग्नानंतरचे धार्मिक विधी पुर्ण करुन आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. भोये |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २९६/१७,भादविक ४२०,४०६ |
| **फिर्यादी** | सौ.राधा धुमाळ,वय-३०,रा.एरंडवणे गावठाण,पुणे |
| **आरोपी** | एक महिला,वय-५५,रा.एरंडवणे गावठाण,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०४/१७ व दि.२१/०४/१७ रोजीचे दरम्यान खिलारेवाडी एरंडवणे गावठाण,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद महिला हया ओळखीच्या असुन,सदर महिलेने फिर्यादी यांना होमगार्डमध्ये नोकरी लावण्याचे अमिष दाखवुन त्यांचेकडुन एकुण ८०,०००/- रुपये घेऊन फिर्यादीस नोकरी न लावता व त्यांचे पैसे परत न करता फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. (फिर्यादी यांची फसवणुक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. खरात |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे २१७/१७,भादविक ४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | कैवल्य फणसळकर,वय-३० वर्षे,रा.कोथरूड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक व्यक्ती |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०७/२०१७. रोजी १६/३० वा.फिर्यादी यांचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक व्यक्तीने फिर्यादी यांना फोन करून त्यांना बँकेतुन बोलत असल्याचे खोटे सांगुन त्यांचेकडुन क्रेडीट कार्डाची गोपनीय माहीती घेवुन,त्या माहीतीचा वापर करून,मोबिक्विकवर ऑनलाईन माध्यमाव्दारे १,००,०००/- रूपये ट्रान्सफर करून घेवुन, फिर्यादी यांना रकमेपैकी मोबिक्विक कडुन ४९,८९०/- रूपये फिर्यादी यांना परत मिळाले असुन,उर्वरीत ५०,०००/- रुपये रक्कम फिर्यादीस न देता त्यांची फसवणुक केली आहे. (फिर्यादी हे बेंगलोर येथे गेले असल्याने त्यांनी आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. श्रीमती. रेखा साळुंखे ९४२२००८३७१ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे २४५/१७,भादविक ४२०,४०६,३४ |
| **फिर्यादी** | स्वाती जगताप,वय-३९,रा.संकेत विहार,फुरसुंगी,पुणे |
| **आरोपी** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०२/१२ ते दि.२६/०४/१५ रोजीचे दरम्यान न्यु इरा सोसायटी गंगाधाम, मार्केटयार्ड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी तसेच साक्षीदार १.श्रीमती.पदमावती ठाकुर २.किर्ती पारकर यांना पैसे दुप्पट करुन देण्याचे अमिष दाखवुन,फिर्यादी यांचेकडुन ३ लाख रुपये, किर्ती ठाकुर यांचेकडुन २,५०,०००/- रुपये व किर्ती पारकर यांचेकडुन २,००,०००/- रुपये असे तिघींचे मिळुन एकुण ७,५०,०००/- रुपये घेऊन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा तक्रारी अर्जावरुन दाखल.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पाटील ९८२३५६०३६० |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | एमआयडीसी पो स्टे ३६८/१७,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | सुनिल परदेशी,वय-५६ वर्ष,रा.नाशिक |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१२/२०१७ रोजी १५/०० वा. मोशी कृषी प्रदर्शन पेंडाल नं.०६,स्टॉल नं.६२८,मोशी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची त्यांचेकडील कापडी पिशवी मध्ये १,५०,१००/- रोख रक्कम मोशी कृषी प्रदर्शन पेंडाल नं.०६,स्टॉल नं.६२८,मोशी,पुणे येथे ठेवली असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे कापडी पिशवी व त्यातील रोख रक्कम चोरुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. एम.ए.कडु |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे /१७,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | तेजस्विनी साळवेकर,वय-३९ वर्षे,रा.बावधन,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम (संशईत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/१२/२०१७ रोजी २१/०० वा. ते दि.१५/२/२०१७ रोजी सकाळी ११/३० वा.चे दरम्यान मांजरी द्राक्ष बागायतदार संघ मांजरी फॉर्म,हडपसर,पुणे येथील पुर्वेकडील गेट नं.१ चे आतील बाजुस मांजरी ता.हेवली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी अवैद्य वाळुची वाहतुक करणारे ट्रक सरकारी कारवाई करण्यासाठी ताब्यात घेवुन ते ट्रक मांजरी द्राक्ष बागायतदार संघ मांजरी फॉर्म येथील पुर्वेकडील गेट नं.१ चे आतील बाजुस संरक्षण कामी लावुन ठेवले असता,नमुद ट्रकचे मालक दोन अनोळखी इसमांनी नमुद कालावधीत फिर्यादी यांचे संमतीशिवाय १.ट्रक नं.एम.एच./१२/के.आर/ ५५०८, त्यामध्ये ४.५ ब्रास वाळु २.ट्रक नं.एम.एच.१२ एच.बी.५५०८,त्यामध्ये ४.५ ब्रास वाळू ३.ट्रक नं. एम.एच.१२ एम.व्हि.९९५६ त्यामध्ये ४.५ ब्रास वाळु ४.ट्रक नं.एम.एच.१२ एच.बी.७५७८,त्या मध्ये ४.५ ब्रास वाळु ट्रक असे एकुण चार ट्रक वाळुसह भरलेले १८,४१,६००/- रू किचे सदर इसमांनी चोरून नेल्याचा संशय आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. सोनवणे |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**